**ठळक बातम्या**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, लोकसभेत १११ टक्के, तर राज्यसभेत १२१ टक्के विधायक कामाची नोंद
- पारंपरिक औषधशास्त्राचं महत्त्व वाढवण्यासाठी विज्ञानाद्वारे लोकांचा विश्वास संपादित करणं गरजेचं असल्याचं प्रधानमंत्र्यां◌ंच प्रतिपादन
- राज्यातल्या २३ नगरपरिषदा, नगरपंचायतींसाठी उद्या मतदान
- माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती द्यायला उच्चा न्यायालयाचा नकार, वैद्यकीय कारणास्तव जामीन मंजूर

**आणि**

- १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारत अंतिम फेरीत

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. विकसित भारत जी राम जी विधेयक, शाश्वत अणुऊर्जा विकास विधेयक, सबका बिमा, सबकी रक्षा विधेयक, निरस्तीकरण आणि दुरुस्ती विधेयक इत्यादी महत्त्वाची विधेयकं संसदेनं या सत्रात मंजूर केली. तसंच, पुरवणी मागण्यांच्या पहिल्या टप्प्यात १ लाख ३२ हजार कोटी रुपयांच्या खर्चालाही संसदेनं हिरवा कंदील दाखवला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

*(हिवाळी अधिवेशनाच्या काळात लोकसभेच्या १५ बैठका झाल्या आणि १११ टक्के विधायक कामकाज झालं, अशी माहिती लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज संस्थगित करण्यापूर्वी दिली. राज्यसभेच्या कामकाजात काल वारंवार आलेल्या व्यत्ययाबद्दल अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी नाराजी व्यक्त केली आणि या वागणुकीची पुनरावृत्ती भविष्यात होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली. राज्यसभेत यंदा सुमारे ९२ तास कामकाज झालं आणि १२१ टक्के उत्पादकतेची*

*नोंद झाली, असं राधाकृष्णन यांनी सांगितलं. १ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या सत्रादरम्यान संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त विशेष चर्चा, तसंच निवडणूक सुधारणांवर चर्चा झाली.*

*मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्ध विरोधी पक्षांच्या खासदारांनी दाखल केलेल्या महाभियोगाच्या प्रस्तावावर विचार करू, असं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. ई-सिगरेट्सच्या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करायचं आश्वासनही त्यांनी दिलं.*

*या अधिवेशनात मंजूर झालेली विधेयकं कोट्यवधी नागरिकांचं जीवनमान उंचावण्यात आणि भारताला विकसित देश करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी वार्ताहर परिषदेत व्यक्त केला. जीरामजी विधेयकाबद्दल रिजिजू म्हणाले,*

***होल्ड... बाईट- किरेन रिजिजू***

*तर, हा कायदा आणून सरकार मजुरांकडून त्यांचे अधिकार काढून घेत आहे, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी वार्ताहर परिषदेत केला.*

***होल्ड... बाईट- जयराम रमेश***

*अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेसच्या प्रियांका गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि इतर नेत्यांनी सभापती ओम बिर्ला यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. तसंच संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री के. राम मोहन नायडू, राजीव रंजन सिंह, चिराग पासवान, प्रल्हाद जोशी यांनीही सभापतींची भेट घेतली.)*

**<><><><><>**

तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्याची परवानगी देणारा लोकपालांचा आदेश दिल्ली उच्च न्यायालयानं बाजूला ठेवला आहे. मोईत्रा यांनी संसदेत प्रश्न विचारण्यासाठी लाच घेतल्याच्या आरोपांची चौकशी करुन आरोपपत्र दाखल करावं असा आदेश लोकपालांनी सीबीआयला दिला होता. त्याला महुआ मोईत्रांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**<><><><><>**

पारंपरिक औषधशास्त्राला योग्य ते महत्त्व दिलं जात नसून ते वाढवण्यासाठी विज्ञानाद्वारे लोकांचा विश्वास संपादित करणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. पारंपरिक औषधांवरच्या जागतिक आरोग्य संघटनेच्या

जागतिक परिषदेत ते नवी दिल्लीत बोलत होते. पारंपरिक औषधशास्त्राला चालना देण्यासाठी संशोधन, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि नियमन आराखडा तयार करणं महत्त्वाचं असल्याचं त्यांनी सांगितलं. यात योगाचं महत्त्वंही त्यांनी अधोरेखित केलं.

***होल्ड... बाईट- नरेंद्र मोदी***

या कार्यक्रमात माय आयुष एकात्मिक सेवा पोर्टल, आयुष उत्पादनं आणि सेवांसाठीचं मानक असलेला आयुष मार्क, योग प्रशिक्षणाविषयीचा जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल, आयुष मंत्रालयाच्या ११ वर्षांच्या वाटचालीचा लेखाजोखा घेणारं एक पुस्तक, तसंच अश्वगंधा या औषधी वनस्पतीचं चित्र असलेल्या एका विशेष टपाल तिकिटाचं अनावरण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झालं. जागतिक आरोग्य संघटनेचे महासचिव टेड्रोस घेब्रेयसुस, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, आयुषमंत्री प्रतापराव जाधव आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायती तसंच १५४ सदस्यपदांसाठी उद्या मतदान होणार आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून कर्मचारी मतदान केंद्रांवर पोहोचत आहेत. या सर्व जागा तसंच २ डिसेंबरला मतदान झालेल्या ठिकाणांची एकत्रित मतमोजणी रविवारी होईल.

**<><><><><>**

सदनिका घोटाळ्याप्रकरणी राज्याचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. न्यायालयानं शिक्षेला स्थगिती दिली नसल्यानं त्यांची आमदारकी जाईल, अशी माहिती या प्रकरणातल्या वकील श्रद्धा ढुबे-पाटील यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. मात्र वैद्यकीय कारणास्तव कोकाटे यांची अटक न्यायालयानं पुढे ढकलली आहे. त्यांना

१ लाख रुपयाच्या जातमुचलक्यावर उच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला. दरम्यान, कोकाटे यांची आज अँजिओग्राफी झाली.

**<><><><><>**

दिल्ली राजधानी क्षेत्रातल्या हवेची गुणवत्ता एका आठवड्यात सुधारण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करायचे निर्देश केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी आज संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नवी दिल्लीतल्या हवेच्या गुणवत्तेबद्दल आज झालेल्या चौथ्या उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. दिल्ली, हरियाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांनी तसंच महानगरपालिकांनी प्रदूषण कमी करण्यासाठी सुचवलेल्या कृती योजनांचा त्यांनी आढावा घेतला. या योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी येत्या जानेवारीपासून दर महिन्याला मंत्रीस्तरीय बैठक घेण्याची घोषणा त्यांनी केली.

दिल्लीतल्या शाळांमधल्या १० हजार वर्गांमध्ये पहिल्या टप्प्यात हवा शुद्धीकरण यंत्रं बसवण्यात येणार असल्याची माहिती दिल्लीचे शिक्षणमंत्री आशिष सूद यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना दिली.

दरम्यान, उत्तर भारतात दाट धुक्यामुळे विमान वाहतुकीवर परिणाम होण्याचा अंदाज नागरी उड्डाण मंत्रालयानं व्यक्त केला आहे.

धुक्याचा फटका विविध रेल्वेगाड्यांनाही बसला असून ६० गाड्या ५ तासांपर्यंत विलंबानं धावत असल्याची माहिती भारतीय रेल्वेनं दिली आहे.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयानं क्रिकेटपटू युवराज सिंग, रॉबिन उथप्पा आणि कलाकार उर्वशी रौतेला, सोनू सूद, मीमी चक्रवर्ती, अंकुश हाजरा आणि नेहा शर्मा यांची सुमारे ८ कोटींची संपत्ती जप्त केली आहे. अवैध बेटिंगप्रकरणी ईडीनं ही कारवाई केली. या सर्वांनी या बेटिंग कंपन्यांची जाहिरात केली होती.

**<><><><><>**

बांगलादेशात सुरू असलेल्या हिंसाचाराचा प्रतिकार करण्याचं आवाहन तिथल्या हंगामी सरकारनं नागरिकांना केलं आहे. बांगलादेशात जुलैमधे झालेल्या बंडाचा एक प्रमुख नेता शरीफ ओस्मान हादी हा काही दिवसांपूर्वी गोळीबारात जखमी झाला. सिंगापूरमधे उपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला. त्याचा मृतदेह ढाक्यात पोचल्यावर काल रात्री विविध भागात तोडफोड आणि हल्ले सुरु झाले.

**<><><><><>**

१९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ८ गडी राखून मात केली. श्रीलंकेनं ८ गडी गमावून दिलेलं १३८ धावांचं आव्हान भारतानं २ गड्यांच्या मोबदल्यात २ षटकं राखून पूर्ण केलं.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरु आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १३ व्या षटकात ३ बाद १२६ धावा झाल्या होत्या.

या मालिकेत भारत २-१ नं आघाडीवर आहे. बुधवारी मालिकेतला चौथा टी-२० सामना धुक्यामुळे रद्द करावा लागला होता.

**<><><><><>**

तेलंगणची राजधानी हैदराबाद इथं सीपीआय माओवादी या संघटनेच्या ६ वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसह एकंदर ४१ नक्षलवाद्यांनी आज पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं.

**//<><><><><>//**